# प्रकरण III

# नियोजन आणि वित्तीय व्यवस्थापन

# प्रकरण III

# नियोजन आणि वित्तीय व्यवस्थापन

## 3.1 नियोजन

योजनेच्या नियोजन व अंमलबजावणीसाठी ग्राम पंचायत ही महत्त्वाची संस्था आहे. हा एक मागणीवर आधारित सार्वजनिक मजुरी रोजगार कार्यक्रम आहे, जिथे मागणीनुसार, कामे हाती घेतली जातात आणि रोजगाराची संधी उपलब्ध केली जाते.

रोजगार उपलब्ध करून कामांच्या मागणीची पूर्तता करणे ही योजनेंतर्गत नियोजनाची प्रक्रिया असून ती मजूर अर्थसंकल्प तयार करून साध्य केली जाते. यामध्ये कामाची मागणी केली जाण्याच्या शक्यतेचे प्रमाण आणि अशा मागणीच्या वेळेचे पूर्वमूल्यांकन केले जाते आणि त्याचवेळी ही मागणी पूर्ण करण्यासाठी प्राधान्यक्रमाने घेतलेल्या प्रकल्पांचा आराखडा तयार केला जातो. मजूर अर्थसंकल्प भाग म्हणून हाती घेण्यात येणारा प्रकल्प आराखडा हा विकास आराखड्याशी[1] सुस्पष्ट असणे आवश्यक आहे.

### 3.1.1 वार्षिक कृती आराखडा व मजूर अर्थसंकल्प

वार्षिक कृती आराखडा व मजूर अर्थसंकल्प, ग्राम पंचायत स्तरावर तयार करण्यात आले होते, त्याचे तालुका आणि जिल्हा परिषद स्तरावर एकत्रीकरण करण्यात आले. कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 6.1.3 नुसार, जिल्ह्यातील प्रत्येक ग्राम सभेने निवडलेल्या प्रकल्पांच्या आराखड्याच्या नियोजनापासून ते मंजुरीपर्यंत मूळापासून दृष्टिकोनाच्या तत्वांचे काटेकोरपणे पालन केले जाण्याची सुनिश्चिती जिल्हा कार्यक्रम समन्वयकाने करणे आवश्यक आहे. मजूर अर्थसंकल्पामध्ये कामाची मागणी करणाऱ्यांसाठी पुरविल्या जाणाऱ्या कामाचे प्रमाण आणि वेळापत्रक दर्शविणारी योजना आणि महिना-निहाय अपेक्षित मागणीचा समावेश असावा. यात प्रकल्पांची ओळख पटवणे आणि मजूर अर्थसंकल्प तयार करणे यांचा समावेश आहे. जिल्हा परिषदेने मजूर अर्थसंकल्प मंजूर केल्यानंतर ते आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांच्याकडे सादर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केले जाते. आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) राज्य मजूर अर्थसंकल्प एकत्रित करतात आणि भारत सरकारला सादर करतात.

लेखापरीक्षणात पुढील परिच्छेदांमध्ये चर्चा केल्याप्रमाणे मजूर अर्थसंकल्प आणि त्या दृष्टीकोनातून योजना तयार करताना विविध त्रुटी आढळल्या.

---

[1] विकास आराखडा हा प्राधान्यक्रमाच्या गरजा आणि उपलब्ध संसाधने यांची जुळवाजुळव करून तयार केलेला वार्षिक आराखडा आहे.

### *(i) आधारभूत सर्वेक्षण*

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 6.2 नुसार, ग्राम पंचायतीत रोजगाराच्या मागणीचे प्रमाण आणि वेळेच्या मूल्यांकनासाठी आधारभूत संरचना तयार करण्यासाठी ग्राम पंचायतीला जॉब कार्डधारकांचे सर्वेक्षण करणे अनिवार्य आहे. सर्वेक्षणात ग्राम पंचायतीमधील प्रत्येक जॉब कार्डधारकाकडून रोजगाराच्या हंगामी मागणीची माहिती घ्यायची होती. उपजीविकेच्या स्वरुपातील स्थानिक पातळीवर होणारे बदल आणि उत्पादनात्मक क्रियांमधील रोजगाराच्या संधी यांचा विचार करण्यासाठी दर पाच वर्षांनी आधारभूत सर्वेक्षण नव्याने करणे आवश्यक आहे.

मार्गदर्शक तत्वांमध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, या आधारभूत सर्वेक्षणाचा आराखडा व कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी तज्ञ संस्थांना नामित करता येईल आणि ही कार्यपद्धती निश्चित झाल्यानंतर त्या संस्था प्रत्येक जिल्ह्यातील पथकांना सर्वेक्षणासाठी प्रशिक्षण देतील. या प्रक्रियेत अग्रगण्य नागरी समाज संघटनांनादेखील मदत करू शकतात, असेही मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र शासनाने आधारभूत सर्वेक्षणासाठी आराखडा आणि कार्यपद्धती अंतिम करण्यासाठी कोणत्याही तज्ञ संस्था/ नागरी समाज संघटनांना नामित केले नाही किंवा कोणतेही आधारभूत सर्वेक्षण केलेले नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 6.1.1 नुसार, मजूर अर्थसंकल्पात पुढील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. (i) कामाच्या मागणीचे अपेक्षित प्रमाण, (ii) कामाच्या मागणीचा कालावधी आणि (iii) कामाची मागणी करणाऱ्यांना पुरविल्या जाणाऱ्या कामाचे प्रमाण आणि वेळापत्रक दर्शविणारी योजना.

निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्पाच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की, विविध अंमलबजावणी संस्थांद्वारे तालुका-निहाय हाती घेण्यात येणारी कामे, कामाची एकूण अंदाजित किंमत, अकुशल आणि कुशल घटकांच्या हिश्श्याच्या कामाच्या खर्चाची टक्केवारी, अपेक्षित मनुष्य दिवस यांचा समावेश होता. मात्र, कामाच्या मागणीचे अपेक्षित प्रमाण आणि कामाच्या मागणीचा कालावधी आणि मजुरी घेणाऱ्यांना पुरविण्यात येणारे कामाचे प्रमाण आणि कामाचा कालावधी दर्शविणारी योजना यांचा मजूर अर्थसंकल्पात समावेश करण्यात आला नव्हता. अशा रीतीने, आधारभूत सर्वेक्षणाच्या अनुपस्थितीत वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्पाने कामाची मागणी करणाऱ्यांना पुरविल्या जाणाऱ्या कामाशी जुळण्यासाठी कामाच्या मागणीचा विचार केला नाही. लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की ग्राम पंचायतींनी सादर केलेल्या 192 वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पामध्ये रोजगाराच्या मागणीचे प्रमाण आणि वेळ उपलब्ध नव्हती.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (जून, 2025) की, मजूर अर्थसंकल्प तयार करताना घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून आधारभूत सर्वेक्षण करण्याच्या सूचना जिल्ह्यांना देण्यात आल्या आहेत.

### *(ii) प्रकल्पांचा आराखडा*

निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींमध्ये लेखापरीक्षणाने 2019-20 ते 2023-24 या कालावधीत वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्पाची पडताळणी केली. पडताळणीसाठी आवश्यक असलेल्या 240 वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पाच्या तुलनेत केवळ 192 वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प लेखापरीक्षण पडताळणीसाठी सादर करण्यात आले. 192 वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पाच्या तपासणीत 153 (80 टक्के) वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पामध्ये प्रकल्पांच्या आराखड्याचा समावेश नसल्याचे निदर्शनास आले.

उत्तरादाखल, आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की (मार्च, 2025) 153 ग्राम पंचायतींनी वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पामध्ये आराखडा सादर केला नसला, तरी त्यांनी तालुकास्तरीय प्राधिकरणामार्फत आपापल्या जिल्ह्यांना ते सादर केले आहेत. प्रकल्पांचे आराखडे लेखापरीक्षणासाठी सादर केले जातील असेही नमूद करण्यात आले. प्रकल्पांच्या आराखड्याच्या अभावी या योजनेअंतर्गत तात्कालिक पद्धतीने कामांची निवड करण्याचा धोका निर्माण होतो.

उत्तरादाखल, आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (जून,2025) की, वार्षिक कृती आराखड्यात वैयक्तिक व सामुदायिक कामांचा समावेश असून भविष्यात कामांचा आराखडा तयार करण्याची खबरदारी घेतली जाईल.

### *(iii) जिल्ह्याच्या दृष्टीकोनातून आराखडा*

कार्यचालन मार्गदर्शक तत्त्वे, 2013 च्या परिच्छेद 15.3.1.1 मध्ये अशी तरतूद आहे की, अभिसरणाच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यांनी एका जिल्ह्याच्या दृष्टीकोनातून आराखडा तयार करणे आवश्यक आहे जो जिल्ह्यांमधील सर्व क्षेत्रांच्या गरजा आणि त्रुटी ओळखतो. हा आराखडा विविध विभागीय प्रकल्पासंबंधित बहु-वार्षिक आराखडा आहे.

अभिलेख्यांच्या तपासणीत असे निदर्शनास आले की, अभिसरण कामांचा मजूर अर्थसंकल्पात समावेश केला गेला होता तरी निवडलेल्या सहा जिल्ह्यांपैकी कोणत्याही जिल्ह्यात जिल्ह्याच्या दृष्टीकोनातून आराखडा तयार करण्यात आला नव्हता. जिल्ह्याच्या दृष्टीकोनातून आराखड्याच्या अनुपस्थितीत, कामाचे अभिसरण सुलभ होण्यासाठी जिल्ह्यात सर्व क्षेत्रांमध्ये करावयाच्या कामांमधील गरजा आणि त्रुटी सुस्पष्ट करण्यात आल्या नव्हत्या.

उत्तरादाखल, आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (जून, 2025) की, राज्य शासनाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील निवडलेल्या

ग्राम पंचायतींना 10 वर्षांचा आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या असून आवश्यक ती कार्यवाही केली जाईल.

### 3.1.2 तालुका संसाधन केंद्र

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 4.3.2 नुसार (i) नियोजनासाठी तांत्रिक सूचना पुरविणे, (ii) स्थानिक नैसर्गिक संसाधनाबाबतचा (उदा. भूजल, पर्जन्यमान, माती/मृदा इ.) विदा तयार ठेवणे जो नियोजनासाठी आवश्यक आहे (iii) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या आणि शासनाच्या इतर उत्पादनाभिमुख योजनांमध्ये अभिसरण सुनिश्चित करण्यासाठी तालुका संसाधन केंद्र स्थापन करणे आवश्यक होते.

नियोजन विभाग (रोजगार हमी योजना), महाराष्ट्र शासन यांनी सादर केलेल्या माहितीनुसार (ऑगस्ट 2024) महाराष्ट्र राज्यात, तालुका संसाधन केंद्रे स्थापन केली नव्हती. नियोजनासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण माहितीचा मुख्य स्त्रोत म्हणजे तालुका संसाधन केंद्र असल्यामुळे त्यांची स्थापना न केल्याने ग्राम पंचायती कोणत्याही सहाय्यक यंत्रणेच्या गैरहजेरीत नियोजन करीत होत्या.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की (जून 2025), उपलब्ध असलेल्या साधनांच्या आधारे तालुका संसाधन केंद्र स्थापन करण्यासाठी कार्यवाही केली जाईल.

### 3.1.3 वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प तयार करून सादर करण्याची कालमर्यादा

2018-19 ते 2023-24 दरम्यान ग्रामीण विकास मंत्रालयाने दरवर्षी जारी केलेल्या मुख्य परिपत्रकानुसार वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प तयार करून सादर करण्यासाठी निर्धारित केलेली कालमर्यादा **तक्ता 3.1** मध्ये दर्शविली आहे

**तक्ता 3.1: वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प तयार करून सादर करण्याची कालमर्यादा**

| अनु क्र | करावयाची कार्यवाही | कालमर्यादा |
|---|---|---|
| 1 | ग्राम पंचायतीद्वारे ग्राम पंचायत स्तरीय आराखडा तालुका पंचायतीला सादर करणे | 5 डिसेंबरपर्यंत |
| 2 | तालुका स्तरीय एकत्रित वार्षिक आराखडा जिल्हा कार्यक्रम समन्वयक/सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्याकडे सादर करणे | 20 डिसेंबरपर्यंत |
| 3 | जिल्हा पंचायतीकडून जिल्हा वार्षिक आराखडा राज्य शासनास सादर करणे. | 31 जानेवारीपर्यंत |
| 4 | राज्य योजना ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारकडे सादर करणे | 10 फेब्रुवारीपर्यंत |

***स्त्रोत: ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी जारी केलेल्या मुख्यपरिपत्रकांमधून संकलित***

लेखापरीक्षणाच्या छाननीत पुढील बाबी निदर्शनास आल्या:

- 2019-20 ते 2023-24 या कालावधीसाठी 240 ग्राम पंचायत स्तरीय, वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पापैकी लेखापरीक्षणासाठी सादर केलेल्या 192 ग्राम पंचायत स्तरीय वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पावरून असे निदर्शनास आले की, 11 ग्राम पंचायतींनी 23 वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प[2] सादर करण्यास विलंब केला. सादर करण्यासाठी झालेला विलंब हा एक दिवस ते 37 दिवसांपर्यंत होता.
- 2019-20 ते 2023-24 या कालावधीसाठी 60 तालुका स्तरीय वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पापैकी सहा तालुक्यांमध्ये 23 वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प[3] सादर करण्यास विलंब झाला. हा विलंब एक दिवसापासून ते 72 दिवसांपर्यंतचा होता.
- 2019-20 ते 2023-24 या कालावधीसाठी निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये 30 जिल्हास्तरीय वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पापैकी सादर करण्यात आलेल्या 29 जिल्हास्तरीय वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पाच्या[4] पडताळणीत, चार जिल्ह्यांमध्ये आठ वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प[5] सादर करण्यास विलंब झाल्याचे दिसून आले. हा विलंब सहा दिवसांपासून ते 139 दिवसांपर्यंतचा होता.
- **तक्ता 3.2** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्य मजूर अर्थसंकल्प सादर करण्यास 16 दिवस ते 47 दिवसांचा विलंब झाला.

---

[2] लेखापरीक्षणास सादर केलेल्या ग्राम पंचायत स्तरावरील 24 वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पामध्ये, वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प तालुक्याकडे पाठविण्याची तारीख उपलब्ध नव्हती.

[3] लेखापरीक्षणास सादर केलेल्या तालुका स्तरावरील नऊ वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पामध्ये वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प जिल्हयांकडे पाठविण्याची तारीख उपलब्ध नव्हती.

[4] 2019-20 या वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प सादर केले नाहीत.

[5] लेखापरीक्षणास सादर केलेल्या नऊ जिल्हास्तरीय वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पामध्ये वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प राज्य शासनाला सादर केल्याची तारीख उपलब्ध नव्हती.

**तक्ता 3.2: ग्रामीण विकास मंत्रालयाकडे वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प सादर करण्यास झालेला विलंब**

| वर्ष | महाराष्ट्र शासनाकडून ग्रामीण विकास मंत्रालयाकडे वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प सादर करण्याची नियत तारीख | वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प ग्रामीण विकास मंत्रालयाकडे सादर करण्याची प्रत्यक्ष तारीख | मजूर अर्थसंकल्प सादर करण्यास झालेला विलंब (दिवसांत) |
|---|---|---|---|
| 2019-20 | 10.02.2019 | 26.02.2019 | 16 |
| 2020-21 | 10.02.2020 | 02.03.2020 | 21 |
| 2021-22 | 10.02.2021 | 26.02.2021 | 16 |
| 2022-23 | 10.02.2022 | 29.03.2022 | 47 |
| 2023-24 | 10.02.2023 | 20.03.2023 | 38 |
| *स्त्रोत: नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) यांनी सादर केलेली माहिती (ऑगस्ट 2024)* | | | |

चाचणी-तपासणी केलेल्या धाराशिव, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये 2020-21, 2021-22 आणि 2023-24 या वर्षांचे जिल्हा वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प राज्याने वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प ग्रामीण विकास मंत्रालयाकडे सादर केल्यानंतर **तक्ता 3.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्य शासनाला सादर करण्यात आल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले.

**तक्ता 3.3: वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प ग्रामीण विकास मंत्रालयाला सादर करण्याच्या तारखेनंतर जिल्हा वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प सादर करणे**

| जिल्हा | वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्पाचे वर्ष | जिल्हयाद्वारे वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प राज्याकडे सादर करण्याची तारीख | वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प ग्रामीण विकास मंत्रालयाकडे सादर करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| धाराशिव | 2020-21 | 19-06-2020 | 02-03-2020 |
| छत्रपती संभाजीनगर | 2021-22 | 01-04-2021 | 26-02-2021 |
| अमरावती | 2023-24 | 24-03-2023 | 20-03-2023 |
| *स्त्रोत: संबंधित जिल्हाधिकारी व नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) यांनी सादर केलेली माहिती (जुलै 2024)* | | | |

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (मार्च 2025) की, वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प विहित मुदतीत नरेगासॉफ्टमध्ये सादर केले जातात, मात्र जिल्हयाच्या सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी विलंब होतो. मात्र जिल्हा पंचायतींच्या मान्यतेनंतरच वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प सादर करायचे असल्याने उत्तर स्वीकारार्ह नाही. वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प ग्रामीण विकास मंत्रालयाकडे सादर करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत आयुक्तांनी नमूद केले की (जून 2025), भविष्यात वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प वेळेत सादर करण्यासाठी खबरदारी घेतली जाईल.

## 3.2 कर्मचाऱ्यांची उपलब्धता

कार्यक्रम अंमलबजावणीसाठी सर्व पातळ्यांवर पुरेशा मनुष्यबळाची तरतूद ही योजनेच्या यशाची गुरुकिल्ली आहे. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या कलम 6-1ई नुसार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असणारे कर्मचारी व तांत्रिक सहाय्य राज्य शासनाकडून जिल्हा कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, सहकार्यक्रम अधिकारी इत्यादींना उपलब्ध करून दिले जातील.

### 3.2.1 अतिरिक्त जिल्हा कार्यक्रम समन्वयक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 4.4.1 नुसार, या योजनेसाठी नेमण्यात आलेल्या पूर्णवेळ अतिरिक्त जिल्हा कार्यक्रम समन्वयकाने योजनेच्या दैनंदिन कामकाजावर लक्ष ठेवावे आणि जिल्हा स्तरावर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे नेतृत्व करावे.

निवडलेल्या एकाही जिल्ह्यात अतिरिक्त जिल्हा कार्यक्रम समन्वयक नेमण्यात आला नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. अनुक्रमे परिच्छेद 3.1.1 (ii), 3.1.1 (iii), 3.1.3 आणि 4.3 मध्ये नमूद केल्यानुसार ग्राम पंचायतींच्या वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्पामध्ये प्रकल्पांच्या आराखड्याची अनुपलब्धता, जिल्हा परिप्रेक्ष्य योजना तयार न करणे, वार्षिक कृती आराखडे आणि मजूर अर्थसंकल्प सादर करण्यास विलंब आणि योजनेअंतर्गत पात्र कुटुंबांची ओळख पटविण्यासाठी घरोघरी जाऊन सर्वेक्षण न करणे हे पूर्ण-वेळ अतिरिक्त जिल्हा कार्यक्रम समन्वयकाच्या नियुक्तीद्वारे प्रभावीपणे हाताळले जाऊ शकले असते

उत्तरादाखल, आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (मार्च 2025) की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून नियुक्त केले जाते. लेखापरीक्षणाचे असे मत आहे की मुख्य कार्यकारी अधिकारी यापूर्वीच संयुक्त जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून नियुक्त केले गेले असल्यामुळे, पूर्णवेळ अतिरिक्त जिल्हा कार्यक्रम समन्वयक योजनेची अंमलबजावणी सुलभ होऊ शकली असती.

### 3.2.2 सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहाय्यक आणि लिपिक-सह-डेटा एंट्री ऑपरेटर यांची नियुक्ती

नियोजन विभाग (रोजगार हमी योजना), महाराष्ट्र शासन यांनी 11 फेब्रुवारी 2013 च्या परिपत्रकाद्वारे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहाय्यक, लिपिक-सह डेटा एंट्री ऑपरेटर अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निश्चित केल्या. नियोजन विभाग (रोजगार हमी योजना), महाराष्ट्र शासन, यांनी नोव्हेंबर 2021 मध्ये जारी केलेल्या शासन निर्णयाद्वारे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी आणि लिपिक-सह-डेटा एंट्री ऑपरेटर यांची आवश्यकता मागील आर्थिक वर्षात निर्माण झालेल्या मनुष्यदिवसांच्या आधारावर आणि सक्रिय जॉब कार्डसच्या संख्येनुसार तांत्रिक

सहाय्यकांची आवश्यकता निश्चित केली. तांत्रिक सहाय्यक हा अंदाजपत्रक तयार करणे, कामांची मोजमापे, कामाची गुणवत्ता सुनिश्चित करणे आदी कामांसाठी जबाबदार होता. निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहाय्यक आणि लिपिक-सह-डेटा एंट्री ऑपरेटर यांची उपलब्धता **तक्ता 3.4** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 3.4: निवडलेल्या जिल्ह्यात जुलै 2024 पर्यंत कर्मचाऱ्यांची उपलब्धता**

| तपशील | पदनाम | अहिल्यानगर | अमरावती | छत्रपती संभाजीनगर | धाराशिव | नागपूर | पालघर | एकूण कमतरता (-) / आधिक्य (+) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **मंजूर पदे** | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी | 28 | 42 | 40 | 21 | 23 | 27 | 181 |
| | लिपिक–सह-डेटा एंट्री ऑपरेटर | 54 | 51 | 64 | 32 | 26 | 48 | 275 |
| | तांत्रिक सहाय्यक | 56 | 178 | 87 | 30 | 43 | 54 | 448 |
| **पदांवरील व्यक्ती** | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी | 23 | 36 | 32 | 21 | 22 | 14 | 148 |
| | लिपिक-सह-डेटा एंट्री ऑपरेटर | 51 | 87 | 86 | 38 | 42 | 50 | 354 |
| | तांत्रिक सहाय्यक | 58 | 107 | 75 | 40 | 46 | 34 | 360 |
| **कमतरता (-) /आधिक्य (+)** | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी | -5 | -6 | -8 | 0 | -1 | -13 | (-)33 |
| | लिपिक-सह-डेटा एंट्री ऑपरेटर | -3 | 36 | 22 | 6 | 16 | 2 | (+)79 |
| | तांत्रिक सहाय्यक | 2 | -71 | -12 | 10 | 3 | -20 | (-)88 |

*स्त्रोत: निवडलेल्या सहा जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेली माहिती*

**तक्ता 3.4** मधून निदर्शनास आल्याप्रमाणे, धाराशिव वगळता निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये 33 सहाय्यक कार्यक्रम अधिकाऱ्यांची कमतरता होती. पाच जिल्ह्यांत 82 लिपिक-सह-डेटा एंट्री ऑपरेटर अतिरिक्त कार्यरत होते, तर एका जिल्ह्यात (अहिल्यानगर) तीन लिपिक-सह-डेटा एंट्री ऑपरेटर्सची कमतरता होती. तसेच, तीन जिल्ह्यांत (अमरावती, छत्रपती संभाजीनगर व पालघर) 103 तांत्रिक सहाय्यकांची कमतरता होती, तर तीन जिल्ह्यांत (अहिल्यानगर, धाराशिव व नागपूर) 15 तांत्रिक सहाय्यक अतिरिक्त होते.

अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि कमतरता असलेल्या जिल्ह्यांमध्ये कर्मचाऱ्यांची नेमणूक न होण्याची कारणे विभागाने स्पष्ट केली नाहीत.

कामांचे मोजमाप करण्याची जबाबदारी तांत्रिक सहाय्यकाकडे होती, तर ग्राम पंचायतीकडून हजेरी पट आणि मजुरी प्रदानास विलंब होणार नाही याची सुनिश्चिती सहायक कार्यक्रम अधिकाऱ्याने करावयाची होती. म्हणूनच, तांत्रिक सहाय्यक आणि सहायक कार्यक्रम अधिकाऱ्याच्या तुटवड्यामुळे मजुरी देयकाच्या प्रदानावर विपरीत परिणाम होतो. मजुरी देण्यास विलंब होण्यामागे कर्मचाऱ्यांची कमतरता हे एक कारण असल्याचे आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी मान्य केले आहे.

### 3.2.3 ग्राम रोजगार सहाय्यक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 4.1.1 नुसार, जेथे या योजनेंतर्गत कामाची मागणी जवळपास अस्तित्वात नाही, अशा ठिकाणांव्यतिरिक्त प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये कमीत-कमी एक ग्राम रोजगार सहाय्यक नियुक्त केला जाईल याची सुनिश्चिती राज्याने करावी. जास्त मजूर क्षमता असलेल्या, आणि विखुरलेल्या वस्त्या आणि आदिवासी भाग असलेल्या ग्राम पंचयतींमध्ये एकापेक्षा जास्त ग्राम रोजगार सहाय्यक नियुक्त केले जाऊ शकतात.

नोंदणी प्रक्रिया, जॉब कार्डस वितरण, नोकरीच्या अर्जांवर तारखेसहित पोचपावतीची तरतूद, अर्जदारांना कामाचे वाटप, ग्राम सभेच्या बैठका व सामाजिक अंकेक्षणाची सोय करणे, मजुरांची उपस्थिती नोंदविणे, कामाच्या ठिकाणी सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करणे, कामगारांचे जॉब कार्डस अद्ययावत करणे, योजनेशी संबंधित सर्व नोंदवह्या तयार ठेवणे इत्यादीवर ग्राम रोजगार सहाय्यकाला देखरेख ठेवावी लागते आणि म्हणूनच ते क्षेत्रपातळीवरील महत्त्वाचे पदाधिकारी आहेत. ग्राम रोजगार सहाय्यकांच्या भरतीसाठी येणारा खर्च हा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रशासकीय खर्चावरील पहिला प्रभार असेल.

राज्यातील 28,279 ग्राम पंचायतींपैकी 2,258 ग्राम पंचायतींमध्ये (आठ टक्के) जेथे कामे हाती घेतली आहेत, तेथे ग्राम रोजगार सहाय्यक नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले (ऑगस्ट 2024). निवडलेल्या 12 तालुक्यांमधील, 951 ग्रामपंचायतींपैकी 13 ग्राम पंचायतींमध्ये कामे हाती घेतली होती, त्या ग्राम पंचायतींमध्ये ग्राम रोजगार सहाय्यक नसल्याचेही लेखापरीक्षणात निदर्शनास आले (ऑगस्ट 2024).

अशाप्रकारे, राज्यातील 2,258 ग्राम पंचायतींमध्ये या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीची खात्री करण्यासाठी महत्त्वाच्या क्षेत्रस्तरीय पदाधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली नाही.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (जून 2025) की, उर्वरित ग्राम पंचायतींमध्ये आवश्यकतेनुसार ग्राम रोजगार सहाय्यक नेमण्याच्या सूचना जिल्ह्यांना देण्यात आल्या आहेत.

### 3.2.4 सहकाऱ्यांची नियुक्ती

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 7.11.1 नुसार, कामगारांची हजेरी घेण्यासह कामाच्या ठिकाणी सुविधांचे व्यवस्थापन करण्यासाठी ग्राम रोजगार सहाय्यकाला मदत करण्यासाठी प्रत्येक कामावर एक सहकारी नेमण्यात यावा. कार्यचालन मार्गदर्शक तत्वांमध्ये (परिच्छेद 5.3) कामाचे मोजमाप, कार्यस्थळावरील सुविधा, नोंदींची देखभाल इत्यादींचा समावेश असलेले प्रशिक्षण सुद्धा सहकाऱ्यांसाठी नमूद केले आहे.

आयुक्त, (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी जून 2020 मध्ये एक परिपत्रक जारी केले होते, ज्यामध्ये सहकाऱ्यांच्या नियुक्तीसाठी पात्रता अटी,

नियुक्ती प्रक्रिया आणि 50 अकुशल कामगारांच्या गटासाठी एका सहकाऱ्याची नियुक्ती यासंबंधी तपशील देण्यात आला होता. सहकाऱ्याच्या नियुक्तीसाठीच्या पात्रतेच्या अटींनुसार, ती व्यक्ती या योजनेंतर्गत सक्रिय कामगार असावी (किमान 60 दिवस काम केलेली असावी), ग्राम रोजगार सहायक/ सरपंच यांच्याशी नात्याने संबंधित नसावी आणि वाचता-लिहिता येणारी असावी आणि त्या व्यक्तिला अंकगणिताचे मूलभूत ज्ञान असावे. भारत सरकारच्या ग्राम विकास मंत्रालयाने काढलेल्या मुख्य परिपत्रकानुसार (जानेवारी 2022), 20 ते 40 मजुरांची उपस्थिती असलेल्या कामांसाठी प्रत्येक 20 कामगारांमागे एक सहकारी नेमण्याची आणि 41 ते 80 कामगारांची उपस्थिती असलेल्या कामांसाठी पुढील प्रत्येक 10 कामगारांमागे एक वाढीव सहकारी नेमण्याची तरतूद केली आहे. मात्र, फेब्रुवारी 2023 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) यांनी भारत सरकारने जारी केलेल्या मुख्य परिपत्रकानुसार सहकाऱ्यांची नियुक्ती करण्याविषयी परिपत्रक जारी करून किमान 50 टक्के महिलांची सहकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी असे नमूद केले आहे. तसेच, नोंदणीकृत सहकाऱ्यांना राष्ट्रीय चल संनियंत्रण प्रणाली[6] या भ्रमणध्वनी अनुप्रयोगाच्या वापरासाठी प्रशिक्षण देणे आवश्यक होते.

नोंदणीकृत सहकाऱ्यांची वर्ष-निहाय स्थिती, नोंदणीकृत महिला सहकाऱ्यांची संख्या, रोजगारात असलेल्या महिला सहकाऱ्यांची संख्या आणि राज्यातील सहकाऱ्यांची प्रलंबित देयके **तक्ता 3.5** मध्ये दर्शविली आहेत.

**तक्ता 3.5: राज्यात 2021-22 ते 2023-24 दरम्यान नोंदणीकृत सहकाऱ्यांची स्थिती**

| च्या अखेरीस | एकूण नोंदणीकृत सहकाऱ्यांची संख्या | नोंदणीकृत महिला सहकाऱ्यांची संख्या (टक्केवारी) |
|---|---|---|
| **मार्च 2022** | 13,871 | 2,680 (19) |
| **मार्च 2023** | 49,008 | 8,884 (18) |
| **मार्च 2024** | 62,617 | 11,623 (19) |
| ***स्त्रोत: नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) द्वारे सादर केलेली माहिती (सप्टेंबर 2024)*** | | |

लेखापरीक्षणात खालील बाबी निदर्शनास आल्या:

- कार्यचालन मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आणि आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी जून 2020 मध्ये जारी केलेल्या परिपत्रकात तरतुदी असूनही 2020-21 दरम्यान राज्यात सहकाऱ्यांची नेमणूक/नोंदणी झाली नव्हती. निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींपैकी 26 ग्राम पंचायतींमध्ये (54 टक्के) 2021-22 ते 2023-24 दरम्यान सहकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. सहकाऱ्यांची नेमणूक न झाल्यामुळे, **परिच्छेद 5.9** मध्ये नमूद केल्याप्रमाणे कामाच्या ठिकाणी अपुऱ्या सुविधांची शक्यता नाकारता येत नाही. उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण

---

6 राष्ट्रीय चल संनियंत्रण प्रणाली अनुप्रयोगात भ्रमणध्वनी अनुप्रयोगाद्वारे कामाच्या ठिकाणी उपस्थिती नोंदविली जाते

रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की (जून 2025), सहकारी असे कोणतेही निश्चित पद नाही आणि ते केवळ विशिष्ट कामासाठी कामगारांच्या संख्येवर आधारित आहे. हे उत्तर ग्राह्य धरले जात नाही, कारण या 26 पैकी 12 ग्राम पंचायतींमध्ये 2023-24 मध्ये 20 पेक्षा अधिक कामगार असलेल्या कामांची अंमलबजवणी केली गेली परंतु सहकाऱ्यांची नेमणूक न झाल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले.

- लेखापरीक्षणाच्या असेही निदर्शनास आले की, किमान 50 टक्के महिलांची सहकारी म्हणून नेमणूक करण्याचे निर्देश असतानाही **तक्ता 3.5** मध्ये दर्शविल्यानुसार 2021-22 ते 2023-24 या कालावधीत महिला सहकाऱ्यांची नोंदणी 18 ते 19 टक्क्यांपर्यंत होती**.** जिथे सहकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे, अशा निवडलेल्या 22 ग्राम पंचायतींपैकी 14 ग्राम पंचायतींमध्ये महिला सहकाऱ्याची नेमणूक झाली नाही, सहा ग्राम पंचायतींमध्ये महिलांची नेमणूक 11 टक्के ते 47 टक्के तर दोन ग्राम पंचायतीमध्ये 50 टक्क्यांपेक्षा जास्त नेमणूक केली गेली. उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (जून 2025) की, सूचनांचे पालन सुनिश्चित केले जाईल.
- सहाय्यक संचालक (रोजगार हमी योजना), नियोजन विभाग यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट 2024 पर्यंत नेमण्यात आलेल्या 62,782 सहकाऱ्यांपैकी 25,906 (41 टक्के) सहकारी प्रशिक्षित नव्हते. उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (जून 2025) की, अप्रशिक्षित सहकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल.
- सप्टेंबर 2025 च्या नरेगासॉफ्टच्या अहवालानुसार, निवडलेल्या 12 तालुक्यांमधील 960 ग्रामपंचायतींपैकी 124 ग्राम पंचायतींमध्ये, 2021-22 ते 2023-24 या कालावधीसाठी सहकाऱ्याची नोंदणी नसतानाही ₹ 1.99 कोटींचे प्रदान करण्यात आले तर ₹ 4.50 लाखांचे प्रदान प्रलंबित होते. निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींपैकी पाच ग्राम पंचायतींमध्ये, 2021-22 ते 2023-24 या कालावधीसाठी सहकाऱ्याची नोंदणी नसतानाही ₹ 5.14 लाखांचे प्रदान करण्यात आले होते, तसेच 2023-24 या कालावधीसाठी ₹ 0.10 लाखांचे प्रदान प्रलंबित होते. अशा रीतीने प्रणालीतील त्रुटी दिसून आल्या ज्यामुळे नोंदणीकृत नसलेल्या सहकाऱ्यांना मजुरी देण्याची मुभा मिळाली.

## 3.3 माहिती, शिक्षण आणि संवाद

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 5.4 नुसार, योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी ग्रामीण लोकांमध्ये आणि इतर हितैषींमध्ये, विशेषत: मजुरांमध्ये योजनेच्या तरतुदी तसेच त्यांचे हक्क आणि हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करणे ही महत्वाची पूर्वशर्त

आहे. माहिती, शिक्षण आणि संवाद उपक्रमांचा उद्देश अधिनियमातील अधिकार-आधारित तरतुदींचा प्रसार सुलभ करणे आणि जेणेकरून मजुरांना त्यांच्या रोजगाराची मागणी करण्याबाबत माहिती मिळणे आणि त्यांच्या गरजेनुसार रोजगारासाठी अर्ज करता यावा यासाठी प्रेरित करणे हा आहे. मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 5.4.2 नुसार, माहिती, शिक्षण आणि संवाद योजनेत राज्य, जिल्हा, तालुका आणि स्थानिक पातळीवरील उपक्रम स्पष्टपणे दर्शविणे आवश्यक आहे. तसेच, भारत सरकारने जारी केलेल्या मुख्य परिपत्रकांनुसार, राज्य शासनाने दरवर्षी माहिती, शिक्षण आणि संवाद आराखडे तयार करून नियमित कालावधीनंतर केंद्र सरकारकडे अहवाल पाठविणे आवश्यक होते.

जरी सहाय्यक संचालक (रोजगार हमी योजना) नियोजन विभाग यांनी नमूद केले (ऑगस्ट 2024) की, माहिती, शिक्षण आणि संवाद आराखडे तयार करण्यात आले होते, तरी त्याच्या प्रती लेखापरीक्षणास सादर केल्या गेल्या नाहीत. 2019-20 ते 2023- 24 या कालावधीत राज्याने एकूण ₹ 818.67 कोटींच्या प्रशासकीय खर्चापैकी माहिती, शिक्षण आणि संवादासाठी ₹ 22.86 कोटी (तीन टक्के) खर्च केले होते. 2019-20 ते 2023-24 या कालावधीत, निवडलेल्या सहा जिल्ह्यांपैकी चार (अमरावती, धाराशिव, नागपूर आणि पालघर) जिल्ह्यांमध्ये एक किंवा त्याहून जास्त वर्षांत फलक आणि भित्तिपत्रे, फिरत्या वाहनांद्वारे जनजागृती आदी माहिती, शिक्षण आणि संवाद उपक्रम हाती घेण्यात आले होते परंतु अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांमध्ये 2019-20 ते 2023-24 या कालावधीत एकही माहिती, शिक्षण आणि संवाद उपक्रम हाती घेण्यात आला नाही, असे लेखापरीक्षणात निदर्शनास आले.

### *3.3.1 रोजगार दिवस*

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या अनुसूची II च्या परिच्छेद 7 नुसार प्रत्येक प्रभाग आणि ग्राम पंचायत स्तरावर महिन्यातून किमान एकदा 'रोजगार दिवस' (रोजगार हमी दिन) आयोजित करणे आवश्यक आहे, ज्यामुळे मागणीनुसार कामाची तरतूद केली जाईल.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत आयोजित करावयाच्या 2,880 'रोजगार दिवस' (महिन्यातून किमान एकदा) च्या तुलनेत निवडलेल्या 48 ग्राम पंचायतींनी दिलेल्या माहितीनुसार, 1,573 'रोजगार दिवस' आयोजित करण्यात आले होते. अशा प्रकारे, 2019- 20 ते 2023-24 या कालावधीत 1,307 'रोजगार दिवस' (45 टक्के) आयोजित करण्यात कमतरता होती. यामध्ये 2019-24 या कालावधीत ‘रोजगार दिवस’ आयोजित न केलेल्या 10 ग्राम पंचायतींचा[7] (निवडलेल्या तीन जिल्ह्यांमध्ये) समावेश आहे.

उत्तरादाखल ग्रामपंचायतींनी नमूद केले की, मार्च 2020 पासून कोविड-19 महामारीमुळे सुरू झालेल्या ताळेबंदीमुळे 'रोजगार दिवस' आयोजित करता आला नाही.

7 अमरावती जिल्हा भामाडेही, चुरणी, गंगारखेडा, हतरू; धारशिव: बावी, भिकार सारोळा, नितळी, उपळे (माकडाचा) आणि डिकसळ; अहिल्यानगर: सामनगाव.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, 2020-21 आणि 2021-22 हे कोविड वर्ष वगळता, 173 'रोजगार दिवस' (2019-20:124; 2022-23:34 आणि 2023-24:15) च्या आयोजनात कमतरता होती.


रोजगार दिवसाच्या आयोजनातील कमतरता, जी कामगारांकडून कामासाठी सक्रियपणे अर्ज मागवण्याची एक यंत्रणा आहे, परिच्छेद 4.6.2 मध्ये नमूद केल्यानुसार योजनेंतर्गत नोंदणीकृत कुटुंबांच्या कमी सहभागाचे एक कारण असू शकते.

उत्तरादाखल आयुक्त, (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (जून 2025) की, सर्व ग्रामपंचायतींमध्ये 'रोजगार दिवसा'च्या दिनदर्शिकेच्या काटेकोरपणे पालनाची सुनिश्चिती केली जाईल.

## 3.4 वित्तीय व्यवस्थापन

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र पुरस्कृत योजना म्हणून केंद्र आणि राज्यांमध्ये खर्चवाटणी तत्त्वावर राबविली जाते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कलम 22 मध्ये निधी वाटपाच्या रचनेचे स्वरूप दर्शविले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कलम 22 नुसार, केंद्र सरकारने अकुशल शारीरिक कामगारांच्या मजुरीचा संपूर्ण खर्च आणि कुशल आणि अकुशल/निम-कुशल कामगारांच्या मजुरीसह साहित्याच्या किंमतीच्या 75 टक्के पर्यंत खर्च करणे आवश्यक होते. प्रशासकीय खर्च (सामाजिक अंकेक्षणावरील खर्चासह एकूण खर्चाच्या सहा टक्क्यांपर्यंत) भारत सरकारने करावयाचा होता. कुशल आणि निम-कुशल कामगारांची मजुरी आणि साहित्य खर्चापैकी 25 टक्के खर्च राज्य शासनाने करणे आवश्यक होते. कामगारांना मजुरीचे प्रदान करण्यास विलंब झाल्यास नुकसान भरपाई भत्ता, मागणीनुसार रोजगार उपलब्ध न झाल्यास बेरोजगारी भत्ता, राज्य रोजगार हमी परिषदेचा प्रशासकीय खर्च आणि 100 दिवसांपेक्षा जास्त काम केलेल्या कामगारांना अकुशल मजुरी यांचा भार राज्य शासनाने उचलणे आवश्यक होते.

या योजनेंतर्गत निधीचे प्रारूप **आलेख 3.1** मध्ये दर्शविण्यात आले आहे.




महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कलम 21 मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे राज्य रोजगार हमी निधी नावाचा निधी स्थापन करावयाचा होता. राज्याने मार्च 2012 मध्ये एक निधी स्थापन केला ज्यामध्ये संकीर्ण जमांसह (उपार्जित व्याज इ.) केंद्र आणि राज्याचे हिस्से जमा केले जाणार होते.

### 3.4.1 निधीचे वितरण आणि विनियोग

मजूर अर्थसंकल्पाच्या कामाच्या मागणीच्या अंदाजावर केंद्राच्या निधी वितरणाचा हिस्सा आधारित असतो. संपूर्ण वर्षासाठी आवश्यक असलेल्या एकूण निधीच्या जास्तीत जास्त 50 टक्के रकमेच्या अधीन राहून आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांच्या गरजा भागविण्यासाठी मजूर अर्थसंकल्पानुसार आनुपातिक निधीच्या आवश्यकतेनुसार केंद्रीय हिश्श्याचा पहिला हप्ता (आगाऊ रकमेसह) वितरीत केला जातो. दुसऱ्या हप्त्याचे वितरण हे (i) अखर्चित शिल्लक आणि (ii) वर्षभरातील मंजूर मजूर अर्थसंकल्पाच्या तुलनेत प्रत्यक्ष कामगिरी यांवर आधारित आहे.

अकुशल मजुरीसाठीचा निधी भारत सरकारकडून राज्याला दिला जातो परंतु तो केंद्रीय स्तरावर ठेवला जातो. अंमलबजावणी यंत्रणांकडून मजुरी मंजूर झाल्यानंतर आणि इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण आदेश तयार झाल्यानंतर, राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक निधी

व्यवस्थापन प्रणालीद्वारे थेट लाभ हस्तांतरणाद्वारे कामगारांच्या खात्यात मजुरी जमा केली जाते.

राज्य एकत्रित निधीमध्ये सामग्रीसाठी आणि प्रशासकीय घटकांसाठी/खर्चासाठी निधी वितरीत केला जातो. केंद्राकडून आलेला निधी आणि राज्याच्या कोषागारातून सामग्री खर्चाच्या संदर्भात राज्याचा संबंधित हिस्सा राज्याकडून आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांच्याद्वारे राखल्या जाणाऱ्या संबंधित राज्य रोजगार हमी निधी खात्यात (राज्य एकल खाते) मुक्त केला जातो. नरेगासॉफ्टमधील प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांनी तयार केलेल्या इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण आदेशाच्या आधारे हा निधी थेट विक्रेते, कंत्राटदार इत्यादींना वितरीत केला जातो.

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या निधी वितरण आदेशानुसार, राज्याच्या कोषागारातून केंद्रीय निधी आणि त्याच्याशी सुसंगत राज्याचा हिस्सा, हा राज्याच्या कोषागारात केंद्राचा निधी प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त 15 दिवसांच्या आत संबंधित राज्य नोडल खात्यात राज्याने मुक्त करणे आवश्यक आहे.

प्राप्त मागणीनुसार आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांच्याकडून जिल्ह्यांना प्रशासकीय खर्चासाठी निधी मुक्त केला जातो. सामाजिक अंकेक्षणाचा निधी राज्य शासनाकडून थेट संचालक, सामाजिक अंकेक्षण यांना मुक्त केला जातो.

वर्ष 2019-20 ते 2023-24 या वर्षांसाठी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचा तपशील, योजनेंतर्गत खर्च आणि अकुशल आणि सामग्री घटकांसाठी दायित्व **परिशिष्ट 3.1** मध्ये दर्शविले आहे**.**

या योजने अंतर्गत जारी करण्यात आलेला निधी आणि केलेला खर्च यामधून खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

- 2019-20 ते 2023-24 या कालावधीत प्राप्त झालेल्या एकूण ₹ 13,957.47 कोटी निधीच्या तुलनेत (₹ 369.42 कोटींच्या प्रारंभीच्या शिलकीसह) ₹ 13,518.30 कोटी (96.85 टक्के) खर्च केले गेले ज्यामुळे ₹ 439.17 कोटी शिल्लक राहिले.
- 2022-23 (₹ 504.82 कोटी) आणि 2023-24 (₹ 421.69 कोटी) या कालावधीत मुक्त करण्यात आलेल्या ₹ 926.51 कोटींच्या राज्याच्या हिश्श्यापैकी (साहित्य घटक) ₹ 415.73 कोटी (45 टक्के) मुक्त करण्यास चार दिवसांपासून ते 242 दिवसांपर्यंत विलंब झाला. 2019-20 ते 2021-22 या कालावधीतील केंद्र व राज्याच्या हिश्श्याचे तारीखनिहाय वितरण आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी लेखापरीक्षणास सादर केले नाही. नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) यांच्याकडून ही माहिती सादर करण्यात आली नाही.

- मार्च 2024 च्या अखेरीस कुशल/अर्ध-कुशल कामगारांसाठी अकुशल मजुरी आणि साहित्य/मजुरीच्या खर्चाची थकबाकी ₹ 1,736.63 कोटी (अकुशल मजुरी: ₹ 761.05 कोटी; कुशल/निम-कुशल कामगारांसाठी साहित्य/मजुरी: ₹ 975.58 कोटी) होती. अकुशल मजुरीप्रती प्रलंबित दायित्वाची कारणे कामगारांची चुकीची आणि निष्क्रिय/बंद खाती इ. होती (परिच्छेद 4.12). कामगार/विक्रेत्यांची चुकीची आणि निष्क्रिय/बंद खाती आणि राज्य शासनाने नमूद केल्याप्रमाणे निधी विलंबाने प्राप्त झाल्यामुळे साहित्य घटकाचे दायित्व प्रलंबित होते. (परिच्छेद 5.13). सप्टेंबर 2025 पर्यंत दायित्व कमी होऊन ₹ 230.72 कोटी झाले (अकुशल वेतन: ₹ 14.04 कोटी, साहित्य/भौतिक घटक: ₹ 216.68 कोटी ज्यात कुशल मजुरीसाठी ₹ 2.24 कोटी समाविष्ट आहेत).

**निष्कर्ष**

ग्रामपंचायतींकडून वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्प सादर करण्यात लक्षणीय विलंब झाला. याशिवाय, कामाच्या मागणीचे प्रमाण आणि वेळेचे मूल्यांकन करण्यासाठी महत्वाचे असणारे आधारभूत सर्वेक्षण केले गेले नाही. सादर केलेल्या वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्पानुसार कामाच्या मागणीचे प्रमाण आणि वेळ, पुरविल्या जाणाऱ्या कामाचे वेळापत्रक आणि संभाव्य मागणीनुसार प्राधान्याने प्रकल्पांचा आराखडा यासंबंधी तपशील समाविष्ट नव्हता, ज्याचा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या नियोजनावर विपरित परिणाम झाला.

योजनेअंतर्गत कामांची अंमलबाजवणी करण्यासाठी आणि कामांवर देखरेख करण्यासाठी ग्रामपंचायतींना सहाय्य करताना महत्वाची भूमिका बजावणाऱ्या ग्राम रोजगार सहाय्यकांची राज्यातील 28,279 ग्रामपंचायतींपैकी 2,258 ग्रामपंचायतींमध्ये नियुक्ती करण्यात आली नाही. याव्यतिरिक्त, 2020-21 या वर्षात कामाच्या ठिकाणी कामावर देखरेख ठेवण्यासाठी जबाबदार असलेल्या सहकाऱ्यांची नोंदणी करण्यात आली नव्हती. या प्रमुख घटकांच्या अनुपस्थितीमुळे योजनेच्या अंमलबजावणीवर परिणाम झाला. राज्य शासनाकडून निधी मुक्त करण्यास विलंब झाला.

**शिफारशी**

***शिफारस क्र. 1: शासनाने वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्पात समाविष्ट केल्या जाणाऱ्या कामांच्या मागणीचे प्रमाण आणि वेळेचे निर्धारण सुनिश्चित करण्याकरिता पायाभूत सर्वेक्षण करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.***

***शिफारस क्र. 2: शासनाने प्रारंभापासून अंमलबजावणी आणि देखरेख क्षमता मजबूत करण्यासाठी सर्व ग्राम पंचायतींमध्ये ग्राम रोजगार सहाय्यक नियुक्त करण्यासाठी कार्यवाही करावी.***